दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
# रायगड नगरी
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित
● वर्ष १७ वे ● अंक २७७ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शुक्रवार दि.६ जानेवारी २०२३ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# रामशेठ ठाकूर यांच्याकडून कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाकरिता पाच कोटींची देणगी

**सातारा । वृत्तसंस्था**

**रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या स्वप्नपूर्तीच्या रूपाने स्थापन झालेल्या कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाला रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौंसिलचे सदस्य थोर देणगीदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पाच कोटी रुपयांची देणगी दिली. सदरचा धनादेश लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्याकडे सातारा येथे झालेल्या सोहळ्यात सुपूर्द केला. यावेळी सर्व उपस्थितांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे आभार व्यक्त करत त्यांच्या कार्याचे कौतुक केले.**



रयत शिक्षण संस्थेत खासदार शरद पवार यांचा सुवर्णमहोत्सवी सक्रिय कार्यकाळ पूर्ण झाल्याबद्दल त्यांच्या ८२ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून संस्थेने विशेष अभीष्टचिंतन व कृतज्ञता सोहळा समारंभ आयोजित केला होता. खासदार श्रीनिवास पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या समारंभास प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, तर संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार दिलीप वळसे-पाटील, सिम्बॉयसिसचे शं. बा. मुजुमदार यांची प्रमुख उपस्थिती होती.

कर्मवीर अण्णांनी रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून आपल्या सगळ्यांसाठी शिक्षणाचे दालन उभे केले. आपली ही संस्था देशातील महत्त्वाची संस्था असून ती नव्या वळणावर आहे. या पुढच्या काळात संस्थेने भविष्याचा वेध घेऊन नाविन्यपूर्ण व अद्ययावत शिक्षण द्यावे, असे प्रतिपादन संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी यावेळी केले.

या समारंभात डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या हस्ते खासदार शरद पवार यांना मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. सचिव प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर यांनी प्रास्ताविक, सूत्रसंचालन प्रा. डॉ. सविता मेनकुदळे यांनी, मानपत्राचे वाचन प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार संस्थेचे सहसचिव राजेंद्र साळुंखे यांनी मानले.

गेल्या पन्नास वर्षांमध्ये संस्थेच्या व्यासपीठावरून खासदार शरद पवार यांनी विचार व्यक्त केलेल्या भाषणांचे संकलन केलेल्या 'रयतच्या विचारमंचावरून' या ग्रंथाचे तसेच विविध कार्यक्रमांमधील छायाचित्रांचे संकलन करून सुवर्णबिंदू या कॉफी टेबल बुकचे व शरदोत्सव या दृकश्राव्य डॉक्युमेंटरीचे प्रकाशन करण्यात आले तसेच रयतवाणी कम्युनिटी रेडिओ स्टेशनचे उद्घाटन करण्यात आले.

# काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले आज पनवेलमध्ये

## इंटक व काँग्रेस कार्यकर्त्यांच्या मेळाव्याचे नियोजन पूर्ण



**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नानाभाऊ पटोले यांच्या प्रमुख उपस्थितीत आज (शुक्रवार दि.६ जानेवारी) इंटकचे अधिवेशन व पनवेल शहर काँग्रेस कार्यकर्त्यांचा मेळावा पार पडणार आहे. या धर्तीवर पनवेलमध्ये नियोजन पूर्ण करण्यात आले असून पनवेल शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष अभिजीत पाटील, तालुकाध्यक्ष नंदराज मुंगाजी, ओबीसी सेल जिल्हाध्यक्ष वैभव पाटील व प्रताप गावंड यांनी कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी येथे हेलिपॅडची पाहणी करून नियोजनाचा आढावा घेतला.

शुक्रवारी सकाळी १०:३० वाजता नानभाऊ पटोले यांचे कळंबोली महामार्ग येथे आगमन व स्वागत होणार आहे. त्यानंतर कळंबोली सर्कल येथून पनवेलच्या दिशेने बाईक रॅली काढण्यात येईल. पनवेल येथे पोहोचल्यावर सर्वप्रथम डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याला अभिवादन व छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्याला अभिवादन केले जाणार आहे. त्यानंतर ठीक ११ वाजता पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात महाराष्ट्र इंटकच्या राज्यस्तरीय अधिवेशनाचे व काँग्रेस कार्यकर्त्यांच्या मेळाव्याचे उद्घाटन प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. त्यानंतर नानभाऊ पटोले हे उपस्थित कार्यकर्त्यांशी संवाद साधणार आहेत.

याप्रसंगी इंटकचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष माजी आमदार जयप्रकाश छाजेड, इंटकचे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष तथा रायगड जिल्हा काँग्रेस अध्यक्ष महेंद्र घरत, पनवेल काँग्रेस निरीक्षक माजी आमदार हुस्नबानू खलिफे, पनवेल शहर जिल्हाध्यक्ष अभिजीत पाटील, मुंबई अध्यक्ष




दिवाकर दळवी, इंटक नवी मुंबई अध्यक्ष रवींद्र सावंत, रायगड जिल्हाध्यक्ष किरीट पाटील यांच्यासह इंटक व काँग्रेसचे प्रमुख नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते व महाराष्ट्रातील वेगवेगळ्या कामगार संघटनांचे पदाधिकारी या मेळाव्याला उपस्थित राहणार आहेत.

इंटक व पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कार्यकर्त्यांच्या मेळाव्यादरम्यान पनवेल शहर जिल्ह्याच्या नूतन कार्यकारिणीची घोषणा करण्यात येणार आहे. यासह पनवेल अर्बन बँकेचे नवनिर्वाचित संचालक तसेच पनवेल उरण तालुक्यातील नवनिर्वाचित ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्यांचा नानभाऊ पटोले यांच्याहस्ते सत्कार होणार आहे. त्याचबरोबर 'हात से हात जोडो' अभियानासंदर्भात माहिती व नियोजन करण्यात येणार आहे. तसेच अन्य पक्षातून काँग्रेसमध्ये येणाऱ्यांचा जाहीर पक्षप्रवेश यासह विविध महत्वाच्या विषयावर चर्चा करण्यात येणार आहे. या मेळाव्यास पनवेल, नवी मुंबई व रायगड जिल्ह्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, पनवेल शहर जिल्हाध्यक्ष अभिजीत पाटील व मेळाव्याचे स्वागत समिती संयोजक वैभव पाटील यांनी केले आहे.

# नवीन पनवेल उड्डाणपुल आणि एचडीएफसी सर्कल काँक्रीटीकरण कामाचा शुभारंभ

## आ.प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वामुळे कामाला मिळाली मंजुरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली व भाजपचे शहर उपाध्यक्ष संदीप पाटील यांच्या पुढाकाराने झालेल्या रास्ता रोको आंदोलनामुळे नवीन पनवेल उड्डाणपुल आणि एचडीएफसी सर्कल काँक्रीटीकरण करण्याच्या कामाला सिडकोने ०२ कोटी ४८ लाख रुपयांची मंजुरी मिळाली होती. त्या विकासकामाचा शुभारंभ आज (दि. ०५) पनवेल महानगरपालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.


या कार्यक्रमास माजी महापौर कविता चौतमोल, माजी उपमहापौर चारुशीला घरत, शहर अध्यक्ष जयंत पगडे, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, माजी नगरसेवक संतोष शेट्टी, समीर ठाकूर, माजी नगरसेविका सुशीला घरत, राजश्री वावेकर, युवामोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, सिडकोचे कार्यकारी अभियंता अनिल बैले, वाहतूक शाखेचे अधिकारी संजय नाळे, उदित नाईक, श्रीनिवास कोडरू, तन्मय बिरजे, विवेक होन, अक्षय सिंग, शिवाजी भगत, यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

नवीन पनवेल माथेरान महामार्गाला जोडणाऱ्या या पुलामुळे पनवेल तालुक्यातील नेरे आणि माथेरानकडे जाणारी शेकडो गावे, वाड्या, पाडे जोडली असून दळणवळणाचा हा प्रमुख मार्ग आहे. या उड्डाण पुलाची पावसामुळे दुरावस्था झाली होती. या खड्ड्यामुळे रोज अपघात होऊन अनेक जण जखमी झाले असल्याच्या घटना घडल्या आहेत. या पूलावरील रहदारीचा विचार करता पूलाच्या उतारावरील दोन्ही बाजूला सिमेंट कॉकेटीकरण होणे गरजेचे असताना सिडको त्याकडे दुर्लक्ष करीत असल्याने हा उड्डाण पूल खड्डे मुक्त करण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली भर पावसामध्ये पूलावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले होते. भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी हिरीरीने सहभाग घेत पावसात भिजत रस्ता अडवल्यावर सिडकोचे बांधकाम खात्याचे कार्यकारी अभियंत्यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांना भेटून आम्ही दोन महिन्यात टेंडर प्रोसेस सुरू करतो तुम्ही आंदोलन मागे घ्या सांगत होते. पण त्याला नकार देऊन सर्वांनी पावसात रस्त्यावर ठाण मांडले तर काहीजण रस्त्यावर झोपले होते. शेवटी सिडको प्रशासन या आंदोलनापुढे नमले आणि सिडकोचे सह व्यवस्थापकीय संचालक कैलास शिंदे यांनी या पुलाच्या चारी बाजूंचे कॉकिटीकरण करण्याची निवीदा काढण्यात येईल असे आश्वासन आमदार प्रशांत ठाकूर यांना दिले होते. त्या अनुषंगाने सिडकोकडून न्यू पनवेल आरओबी येथे डेक स्लॅबच्या रिसरफेसिंगसह जोडरस्त्यांचे काँक्रीटीकरण करणे या शीर्षकाखाली ०२ कोटी ४८ लाख ६९ हजार ८३९ रुपयांची बोली मागवणारी सूचना प्रसिद्ध झाली होती. त्यानुसार या कामाचे आज भूमिपूजन झाले. यामुळे वाहनचालक, प्रवाशी, नागरिकांकडून आमदार प्रशांत ठाकूर यांचे आभार मानले जात आहेत.





जेष्ठ पत्रकार माधवराव पाटील यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना दैनिक रायगड नगरी संपादक राकेश पितळे, पत्रकार अरविंद पोतदार, निवृत्त एस.टी कर्मचारी जनार्दन ठाकूर

# पत्रकारांनी बाळशास्त्री जांभेकरांचा आदर्श घ्यावा

कोकण ही नररत्नांची खाण आहे. आकाशाला गवसणी घालणाऱ्या विभूती या लाल मातीत जन्मल्या. त्यात आचार्य विनोबा भावे, डा.बाबासाहेब आंबेडकर, अर्थतज्ञ डॉ.सी.डी देशमुख, म.म.दत्तो वामन पोतदार, महर्षी धोंडो केशव कर्वे, स्वाध्यायकार पांडुरंगशास्त्री आठवले, थोर निरुपणकार डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी इत्यादींचा समावेश होतो.

बाळशास्त्री जांभेकर त्या विभूतींपैकी एक आहेत. प्रकांड बुद्धिमत्ता, अफाट स्मरणशक्ती, वाचनाची आवड, विविध भाषांवर कमांड, कमालीची जिद्द व ध्येय निश्चितीने झपाटलेल्या जांभेकरांची पेंभुर्ले (जि.सिंधुदूर्ग ) ही जन्मभूमी. त्यांचे इ.चौथी पर्यंत शिक्षण मायभूमीत झाले. पेंभुर्ले हे गाव मराठी भाषिक पत्रकारांचे तीर्थक्षेत्र आहे. दि.६ जानेवारी हा दिवस पत्रकार दिन साजरा केला जातो. पत्रकारितेत उत्कृष्ठ काम करणाऱ्या पत्रकारांना बाळशास्त्रींच्या स्मृतीप्रित्यर्थ दर्पण पुरस्काराने सन्मानित केले जाते. या गावी बाळशास्त्रींचे राष्ट्रीय स्मारक उभारले असून दरवर्षी तेथे पत्रकार दिनाचा मुख्य कार्यक्रम आयोजिला जातो.

बाळशास्त्री जांभेकरांची अफाट बुध्दीमत्ता व तीव्र स्मरणशक्ती पाहून या हिऱ्याला कोंदण पाडण्यास संस्कृततज्ञ बापू छत्रे यांच्याकडे इंग्रजी व संस्कृत शिकण्यासाठी पाठविले. तसेच नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या इंग्रजी शाळेत दाखल करून अवघ्या ५ वर्षांमध्ये तेथील अभ्यासक्रम पूर्ण करून त्यांनी इंग्रजी, संस्कृत व अन्य भाषांवर प्रभुत्व गाजविले. मुंबईत आल्यानंतर बाळशास्त्रींच्या ज्ञानाला धुमारे फुटले. येथे त्यांना प्रखर बुद्धीमतेचे मित्र भेटले. सखोल वाचनासाठी एशियाटिक लायब्ररी सारखे मोठे ग्रंथालय मिळाले. देशभक्त दादाभाई नौरोजी व केरुनाना छत्रे यांची संगत सोबत लाभली. शैक्षणिक प्रयोग करण्यास त्यांना मोठे व्यासपीठ मिळाले. प्रा.अर्लिबार यांच्या मार्गदर्शनामुळे गणित व ज्योतिषशास्त्राचा अभ्यास केला. अनेक जागतिक भाषा आत्मसात करता आल्या. प्रखर बुद्धी, अफाट वाचन व पराकोटीची जिद्द असल्यामुळे अवघ्या ३४ वर्षांच्या आयुर्मानात त्यांनी अनेक जागतिक विक्रम केले. एल्फिस्टन हायस्कूलमध्ये शिक्षक, प्रा.हार्बर यांनी स्थापन केलेल्या ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्यपद भूषविले. शासकीय नॉर्मल स्कूलचे अध्यक्षही झाले. रॉयल एशियाटिक सोसायटीच्या कार्यात भाग घेणारे ते पहिले भारतीय विद्वान ठरले.

शिक्षणतज्ञ बाळशास्त्री असा नामोल्लेख करण्याजोगी त्यांची शिक्षण क्षेत्रातील कामगिरी आहे. विद्यार्थ्यांना विषयाचे आकलन सहजगत्या होण्याजोगी पुस्तके त्यांनी तयार केली. त्यात नीतिकथा, सारसंग्रह, भूगोल, इतिहास, गणित, व्याकरण इ. चा समावेश आहे. ज्ञानेश्वरी हा ग्रंथ प्रथमच मुद्रित स्वरुपात वाचकांच्या हाती त्यांनी दिला. बाटवून ख्रिश्चन झालेल्या श्रीपाद शेषाद्रीला शुद्ध करून हिंदू धर्मात घेतले. तसेच सर्वत्र शुद्धीकरण चळवळ राबवली. त्यांनी सतीची चाल, बालविवाह, स्त्रीभ्रूण हत्या, मुलींची विक्री तसेच अंधश्रद्धेस विरोध करून ते पहिले समाजसुधारक बनले. त्या काळात मराठी भाषिक वर्तमानपत्र नव्हते. ही उणीव दूर होण्यासाठी दर्पण नावाचे साप्ताहिक सुरू केले. काही महिन्यांनी इंग्रजी भाषेतही ते काढले. एवढेच नव्हे तर सर्व विषयांचा सार असलेले दिग्दर्शन हे मासिक चालू करून मराठी भाषेत वृत्तपत्र सृष्टीचा पाया घातला. म्हणून पोंभुर्ले हे गाव मराठी भाषिक पत्रकारांची पंढरी बनली. शिवाय दि.६ जानेवारी हा दिवस पत्रकार दिन साजरा होऊ लागला. समाजहितैषी लेखणी चालविणाऱ्या पत्रकारांना दर्पण पुरस्काराने सन्मानित केले जाते. बाळशास्त्रीजींची मराठी प्रमाणेच संस्कृत, बंगाली, गुजराथी, कानडी, तेलगू, फारशी, फ्रेंच,लॅटिन व ग्रीक भाषांवर मदार होती म्हणून त्यांना पहिले बहुभाषिकोविद म्हणत.

त्यांच्यात सखोल पांडित्य व अध्यापनपटूत्व होते. ते गणित व ज्योतिष शास्त्रात पारंगत होते. म्हणून कुलाबा वेधशाळेच्या संचालकपदी नियुक्ती झाली. गणित, वाङ्मय व विज्ञान या विषयांचे पहिले एतद्देशीय लेक्चरर म्हणून नियुक्ती. शाळा खात्याकडून पहिले नेटिव्ह सेक्रेटरी म्हणून नियुक्ती.प्राचीन लिप्यांचा अभ्यास करून तसेच इतिहासाबाबत पुरावे गोळा करून कोकणातील शिलालेख व ताम्रपट याबाबत शोधनिबंध लिहिले आणि इतिहास संशोधक मंडळाचे संस्थापक बनले. आद्य समाजसुधारक, वृत्तपत्रकार, निबंधकार, भाषांतरकार, इतिहास संशोधक, व्याकरणकार, शिक्षणतज्ञ असे अष्टपैलू व्यक्तिमत्व असलेले बाळशास्त्री वयाच्या अवघ्या ३४ व्या वर्षी जग सोडून गेले.

वृत्तपत्रसृष्टीत रायगडचा वरचष्मा

बाळशास्त्रींचा आदर्श रायगड जिल्ह्यातील पत्रकारांनी गिरविल्यामुळे वृत्तपत्रसृष्टीत या जिल्ह्याचा वरचष्मा टिकून राहिला. अलिबागचे तरूण केशव रावजी आठवले यांनी १८७० साली सत्यवदन हे साप्ताहिक चालू करून जिल्ह्यात वृत्तपत्राचा पाया घातला. लगेचच मुरुड येथे सिंधुयुग्म सुरू झाले. अलिबाग येथे मेडिएटर पाक्षिक तसेच सद्धर्म दीप व अबला मित्र चालू झाले पेण येथे नारायण गणेश मंडलिक यांनी सुधाकर चालविले. माथेरान येथे फ्रामजी मेहता यांनी माथेरान जार्डिग्ज चालू केले. तसेच पेण येथून पेण समाचार, महाड येथून ब्रह्मोदय वैजनाथ (ता.कर्जत) येथून कुलाबा साप्ताहिक सुरू झाले पण कालौघात ती बंद पडली. देशभक्त रामभाऊ मंडलिक यांनी पारतंत्र्य काळात सुरु केलेले कुलाबा समाचार, स्वातंत्र्य, काळातही चालू ठेवले. पण दुर्दैवाने शतक गाठण्यापूर्वीच बंद पडले. बहुजन समाजाचे नेते नारायण नागू पाटील यांच्या नेत्तृत्वाखाली पेझारी येथून १९३७ साली चालू केलेले कोकण कृषीवल चे दैनिकात रुपांतर होऊन कृषीवल या नावाने प्रसिद्ध होत असून ते कोकणात प्रथम दर्जाचे दैनिक ठरले आहे. पारतंत्र्य काळात अलिबाग येथून राष्ट्रतेज साप्ताहिक चालू झाले. पण तेही स्वातंत्र्य काळात बंद पडले. अनेक पत्रकार घडले भारताच्या स्वातंत्र्य प्राप्तीनंतर अनेक भाषा, अनैक धर्म, अनेक पंथ असलेल्या भारतातील शेवटल्या घटकातील माणसाला विकासाचा किरण गवसण्यासाठी या देशात लोकशाही राज्यपद्धती चालू झाली. स्वातंत्र्याबरोबरच विचार स्वागत, प्रचार स्वातंत्र्य मुद्रण स्वातंत्र्यही मिळाले. लोकशाहीचा ४ था स्तंभ अधिक बळकट होण्यासाठी वृत्तपत्रांना शासकीय जाहिराती चालू केल्याशिवाय पत्रकारांना अधिस्वीकृतीपत्रिका देऊन शासकीय योजनांचा लाभ देऊ केला. म्हणून वृत्तपत्रांचा सुळसुळाट चालू झाला. रायगड जिल्हाही अपवाद नाही. येथेही अनेक वृत्तपत्रे चालू झाली. पत्रकारही घडले. त्यात साप्ताहिक निर्धार, प्रज्ञा, कुलाबा मानस, शंखनाद आदर्श, कुलाबा दर्पण, कुलाबा वैभव, रायगडचा युवक, कोकणनामा (अलिबाग) किल्ले रायगड, विद्या (पनवेल), वादळवारा (उरण), दक्षिण युग (गोरेगाव), कुलाबा शिवतेज (महाड), झुंझार शिक्षक पेण), एकात्मता (महाड), कोकणकडा (गोरेगाव), रायगडचा आवाज, महाड– पोलादपूर टाईम्स, रसायनी टाईम्स, पनवेल टाईस,उरण टाईम्स, जनमत, किनारा, श्रीवर्धन टाईम्स इ. अनेक वृत्तपत्रे प्रकाशित झाली. त्यापैकी काहींनी प्रकाशन बंद केले आहे.

या जिल्ह्याने दिग्गज पत्रकार निर्माण केले आहेत. त्यात माजी आमदार नारायण नागू पाटील व रामभाऊ मंडलिक, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रभाकर पाटील, लोकसत्ताचे संपादक त्र्य.वि. पर्वते, लोकमत संपादक मधुकर भावे यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. पत्रकार अनेकांना प्रसिद्धीच्या झोतात आणतात, पण प्रसिद्धी देणारे पत्रकार मात्र प्रसिद्धीपासून वंचित राहतात. समाजात विधायक कामे करणाऱ्या पत्रकारांचा यथोचित सन्मान होण्यासाठी रायगड पत्रभूषण पुरस्काराने रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघ हा निवडक पत्रकारांचा वर्धापन दिनी सन्मान करते. सन्मानचिन्ह, मानपत्र, रोख रक्कम, शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरुप असते.

या पुरस्काराचे मानकरी विसूभाऊ मंडलिक, नारायण मेकडे, मधुकर कुळकर्णी, राजाभाऊ देसाई , ल.पां.वालेकर, र. हेंद्रे., द.कृ वैरागी, रा.पि. दोशी, म.ना.पाटील, मधुकर हातकमकर, शशिकांत गडकरी, नवीनचंद्रद सोष्टे, दिलीप राजे, बळवंत वालेकर, माधवराव भावे, माधव पाटील, दामोदर शहासने, अरुण करंबे, मदन हणमंते, आनंद जोशी इ. पत्रकार सन्मानित झाले आहेत. म्हणून बाळशास्त्री जांभेकरांप्रमाणे अभ्यासू , चोख़ंदळ व जनमानसाची नाडी जाणणारे पत्रकार निर्माण व्हावेत, हीच पत्रकारदिनी अपेक्षा !


"Kamal Gauri Hiru Patil Shikshan Sanstha's"

**B.K.Patil Institute of Pharmacy**
**Taloja Navi mumbai - 410208**

(Affiliated to MSBTE and University of Mumbai, Approved by DTE , AICTE and PCI U/S 12 of Pharmacy Act 1948)

**Email : bkpatilpharmacy@gmail.com**
**Website : www.bkpiop.in**

**ADMISSION NOTICE 2022-23 (B.Pharm)**

Application are invited from the eligible candidates for the admission to First Year Batchelor in Pharmacy under institute level quota (12 Seats) and seats remained vacant after CAP rounds.

Eligibility: - As per the norms prescribed by Government of Maharashtra State Common Entrance Test Cell, Mumbai. Institute Code: - 3508

**ADMISSION SCHEDULE**

| Sr. No. | Activity | Date |
|---|---|---|
| 1 | Application form distribution & acceptance (Along with attested copies of all documents) | 06/01/23 to 08/01/23 (9 a.m to 5 p.m ) |
| 2 | Display of Provisional Merit List | 08/01/2023 (9 a.m to 5 p.m) |
| 3 | Display of Final List | 09/01/2023 (9 a.m to 5 p.m) |
| 4 | Reporting & Confirmation of admission by paying fees to the institute office (along with Original Documents) | 10/01/23 to 11/01/23 (9 a.m to 5 p.m ) |


# जेएनपीए प्रशासनाकडून मिळाला चार ग्रामपंचायतींना मालमत्ता कर

**दै.रायगड नगरी । उरण**

जेएनपीए प्रशासनाकडून ग्रामपंचायतींना कर मिळाल्याने आता ग्रामपंचायत हद्दीतील विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे.उरणच्या तत्कालिन जेएनपीटी तथा आत्ताच्या जेएनपीए बंदरा कडून स्थानिक ग्रामपंचायतींना येऊ असलेल्या मालमत्ता कराचा प्रश्न काही अंशी सुटला असून यातील ११ पैकी चार ग्रामपंचायतींना मालमत्ता करापोटीच्या धनादेशांचे वाटप जेएनपीए बंदराचे अध्यक्ष संजय सेठी यांच्या हस्ते संपन्न झाला आहे.

जेएनपीए बंदराच्या माध्यमातून तालुक्यातील ११ ग्रामपंचायतींना मालमत्ता कराची रक्कम येणे बाकी आहे. या मागणीच्या निमित्ताने जेएनपीटीच्या कार्यालयांवर जप्तीच्या कारवाया देखील ग्रामपंचायतींच्या माध्यमातून करण्यात आल्या होत्या. या मालमत्ता कराबाबतचा एक दावा मुंबईच्या हाय कोर्टामध्ये सुरू होता. त्या दाव्याच्या अनुषंगाने जेएनपीए आणि स्थानिक कर घेऊ पाहणाऱ्या ११ ग्रामपंचायतींपैकी ६ ग्रामपंचायतींनी एक सामंजस्य करार जेएनपीए सोबत नुकताच केला होता. त्यानुसार या सहा ग्रामपंचायतींना यापुर्वी म्हणजेच २०२० सालापर्यंत दिलेली रक्कम वजा करून रक्कम देण्याचे ठरविण्यात आले होते. त्यानुसार जासई, नवघर जसखार आणि करळ सावरखार या चार ग्रामपंचायतींना तब्बल साडेनऊ कोटींच्या घसघशित रकमेच्या धनादेशांचे वाटप जेएनपीएचे अध्यक्ष संजय सेठी यांच्या हस्ते करण्यात आले आहे. त्यामध्ये सर्वाधिक म्हणजेच ४ कोटी ८३ लाख ५५ हजार ६५९ रूपयांच्या धनादेश करळ सावरखार गग्रामपंचायतला देण्यात आला आहे. तर त्या खालोखाल २ कोटी ३६ लाख ६९ हजार ७७२ रूपायांचा धनादेश जसखार ग्रामपंचायतीला देण्यात आला आहे.अशी माहिती तुकाराम कडू यांनी दिली. या निमित्ताने जासई ग्रामपंचायतीला १ कोटी ८३ लाख ७२ हजार ४७७ रूपायांचा धनादेश देण्यात आला असून नवघर ग्रामपंचायतीला ५९ लाख ८२ हजार ७७० रूपायांचा धनादेश अदा करण्यात आला आहे. ११ पैकी ६ ग्रामपंचायतींनी जेएनपीए सोबत केलेला समझोता करार मा. मुंबई उच्च न्यायालयात सादर केला होता. त्याला न्यायालयाने २४ नोव्हेंबर २०२२ रोजी मान्यता दिली होती त्यानुसारच या मालमत्ता कराच्या रकमेचे वितरण करण्यात आले आहे. त्याचबरोबर या सहा ग्रामपंचायतींनी बँक गॅरंटी म्हणून जमा केलेली रक्कम ही त्यांना लवकरच मिळणार आहे. या सहा ग्रामपंचायतींपैकी सोनारी आणि फुंडे ग्रामपंचायतीला मुदत ठेव म्हणून ठेवण्यात आलेली रक्कम पुढील काही दिवसात अदा होण्याची शक्यता आहे. उर्वरीत ५ ग्रामपंचायतींना देखील जेएनपीएने लवकरात लवकर मालमत्ता कराचे पैसे देऊन ग्रामपंचायतींच्या विकासाला हातभार लावावा अशी मागणी यावेळी जेएनपीटी प्रकल्पग्रस्त ग्रामपंचायतींच्या समन्वय समितीचे निमंत्रक तुकाराम कडू यांनी जेएनपीएचे अध्यक्ष संजय सेठी यांच्याकडे केली आहे.




वस्तूनिष्ठ बातम्या व जाहिरातींसाठी संपर्क साधा
9619979706


# हरवलेला फोन प्रवाशाला दिला मिळवून

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्मवर एका प्रवाशाचा फोन पडला होता. यावेळी गस्त घालणाऱ्या पोलिसाला हा फोन सापडला असून त्यांनी तो ताब्यात घेतला.

वैभव मोहिते या तरुणाचा तो फोन होता. संबंधित तरुणाने फोनवर संपर्क साधल्यानंतर पोलिसांनी फोन त्याचाच असल्याची खात्री करून तो परत केला. याबाबदल वैभव मोहिते याने पोलिस कर्मचाऱ्यांचे आभार मानले आहेत. दरम्यान नवी मुंबई, पनवेलमध्ये मोबाइल चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत आहे.


## जाहीर नोटीस

पाली येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो़.यांचे कोर्टात
फौ.चौ.अर्ज क्र.३९/२०२१

१) श्री.गणेश शांताराम खंडागळे
वय : ४२ वर्षे, धंदा : शेती
रा.मुक्काम पोस्ट : वैतागवाडी,
ता.सुधागड, जिल्हा : रायगड — अर्जदार
विरुद्ध
१) ग्रुप ग्रामपंचायत नाडसूर
ता.सुधागड, जिल्हा : रायगड — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांची आजी कै.मसणी उर्फ काशिबाई बाळकृष्ण खंडागळे यांचा मृत्यू दि.१/६/१९८९ रोजी मुक्काम पोस्ट : वैतागवाडी, ता.सुधागड, जिल्हा : रायगड यांच्या राहत्या घरी झालेला आहे. अर्जदार यांनी त्यांच्या आजीच्या मृत्यूची नोंद होण्याकरिता पाली येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो़. यांचे कोर्टात अर्ज केललो आहे. अर्जदार यांच्या आजीचा मृत्यू वरील नमूद केलेल्या ठिकाणी झालेला आहे. त्याबद्दल कोणास काही कळविण्याचे असेल तसेच सदरहू अर्जास कोणाची हरकत असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून कायदेशीर हरकती नोंदविण्याच्या आहेत. या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत योग्य हरकती न आल्यास सदरहू व्यक्तीच्या मृत्यूची नोंदणी करण्याचे आदेश संबंधितांना देण्यात येईल याची नोंद घ्यावी. येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.२९/१२/२०२२ रोजी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**फौ.न्याया, पाली**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**फौ.न्याया, पाली**



**अपर जिल्हाधिकारी रायगड मुख्यालय अलिबाग यांचे न्यायालयात**
**जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अलिबाग, जि.रायगड**

क्रमांक/आरटीएस/अपिल क्र.२४५/२०२२

१) श्री.धर्मा पांडुरंग नाईक
२) श्री.बळीराम पांडुरंग नाईक
३) श्री.कृष्णा पांडुरंग नाईक
४) श्रीम.सुमती गणपत ढवळे
सर्व रा.टाकीगाव, पो.दिघोडे, ता.उरण, जि.रायगड — अपिलार्थी
विरुद्ध
१) श्रीम.राधाबाई भास्कर घरत
२) श्रीम.वनिता सत्यकांत घरत
३) कुमार अजय सत्यकांत घरत वतीने
अ.पा.क.म्हणून श्रीम.वनिता सत्यकांत घरत
४) कुमारी अमृता सत्यकांत घरत
५) श्रीम.प्रियंका प्रदीप घरत उर्फ प्रियंका देहू पाटील
६) कु.जान्हवी प्रदीप घरत वतीने
अ.पा.क.म्हणून आई श्रीम.प्रियंका प्रदीप घरत
७) माई राज जोशी उर्फ भास्कर घरत
सर्व रा.धाकटी जुई, ता.उरण, जि.रायगड
८) श्रीम.ताई उर्फ संगीता अनंत पाटील
रा.वाजे, ता.पनवेल, जि.रायगड
९) श्री.प्रशांत धाया जोशी
रा.विंधणे, पो.दिघोडे, ता.उरण, जि.रायगड
१०) श्री.हिरामण कमळाकर ठाकूर
रा.बोरखार, पो.दिघोडे, ता.उरण, जि.रायगड — उत्तरार्थी

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ नुसार अपील**

या जाहीर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, मौजे : हरिश्चंद्र पिंपळे, ता.उरण, जि.रायगड येथील सर्व्हे नं./हिस्सा नं.४८/४ क्षेत्र ०–१९–२० आकार २.५० या जमीन मिळकती संदर्भात अपिलार्थी यांनी या न्यायालयात दि.१०/०८/२०२२ रोजी अपिल दाखल केले आहे. सदर अपिलाची नोटीस काढली असता त्याची बजावणी होवू शकली नाही. आपला राहण्याचा शेवटचा पत्ता वरीलप्रमाणे असल्याची माहिती अपिलार्थी यांस आहे. सबब, अपिलार्थी या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, सदर अपिलामध्ये दि.११/०१/२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजता अपर जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचे न्यायालयात सुनावणी निश्चित करण्यात आलेली आहे. तरी आपण स्वतः अगर तुमचे वकीलांमार्फत सदर सुनावणीस हजर रहावे. आपण हजर न राहिल्यास आपले गैरहजेरीत अपिलाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : १९/१२/२०२२

**सही/–**
**अपर जिल्हाधिकारी रायगड**
**अलिबाग करिता**



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, मौजे : काळुंद्रे येथील कै.नामदेव हाल्या कोनकर व कै.नारायण हाल्या कोनकर यांच्या ताब्यातील मिळकती नवी मुंबई प्रकल्पाकरिता संपादीत झाल्या असून सिडकोने त्यांचे वारसांना मौजे : करंजाडे येथे सेक्टर क्र.३ मधील भूखंड क्र.१६९ (अ) क्षेत्र १५० चौ.मी.चा भूखंड लिज कराराने दिलेला आहे.

सदर श्रीमती.लिला नारायण कोनकर, विजय नारायण कोनकर, श्री.नामदेव हाल्या कोनकर, श्रीमती.बेबी हिरा हातमोडे यांनी सदर भूखंडाबाबत आमचे अशिल मे.राज बिल्टेक तर्फे श्री.राजेश मारुती मढवी यांचे लाभांत भूखंडाचा ताबा देण्याबाबत करार करून दिलेला असून सदर करार आजही अस्तित्वात आहे. त्यांनी सदर कराराप्रमाणे भूखंड आमच्या अशिलांना द्यावा म्हणून आमच्या अशिलांनी त्यांचे विरोधात पनवेल दिवाणी कोर्टात स्पे.मु.क्र.४४७/२०२१ चा दावा दाखल केलेला असून त्यामध्ये कराराची पुर्तता करून मागितली असून सदर भूखंड व त्यामधील बांधकाम त्रयस्थ व्यक्तीस विक्री करू नये म्हणून मनाई हुकूमाचा अर्ज दाखल केलेला आहे व तो अर्ज मे.कोर्टात सुनावणीसाठी प्रलंबित आहे.

सदर वर नमूद भूखंडात आमच्या अशिलांचे हक्क व अधिकार निर्माण झालेले असून आजही अस्तित्वात असताना सदर श्री.कोनकर यांनी वर नमूद भूखंड आमच्या अशिलांच्या संमती शिवाय मे.वैष्णवी बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे श्री.अभिषेक दिवाकर यांना विक्री करून त्यांचे नावे ट्रान्सफर केलेला आहे.

त्यामुळे मे.वैष्णवी बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स यांनाही सदर दाव्यात पक्षकार बनविले असून त्यांचे विरोधातही मनाई हुकूमाचे आदेश मागितलेले आहे व त्यांनी सदर इमारतीमधील सदनिका व व्यावसायिक गाळे विक्री करू नये व केले असल्यास ते रद्द करून मिळावे म्हणून मागणी आहे. सदर भूखंडात आमच्या अशिलांचे हक्क अस्तित्वात असताना भूखंड मे.वैष्णवी बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स यांना विक्री केल्याने सदर भूखंडाचे व त्यावरील बांधकामाचे मालकी हक्क / टायटल क्लिअर व मार्केटेबल नाही व दोषयुक्त असून दाव्याचे निर्णयावर आधारित आहेत व दाव्याच्या निकालांवर आधारित राहील व सदर दाव्याचा निकाल सदनिका खरेदी करणार यांचेवर बंधनकारक राहील.

त्यामुळे सदर भूखंडावरील इमारतीमधील सदनिका व गाळे याबाबत कोणीही सदर श्रीमती.लिला नारायण कोनकर, विजय नारायण कोनकर, श्री.नामदेव हाल्या कोनकर, श्रीमती.बेबी हिरा उर्फ तारामती हिरु कोनकर उर्फ उदरे व इतर यांच्या बरोबर तसेच मे.वैष्णवी बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स यांचे बरोबर खरेदी विक्रीचा व्यवहार करू नये व केला असल्यास तो ताबडतोब रद्द करून घ्यावा. सदरचा कोणताही व्यवहार आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व दाव्याचा निकाल आमच्या अशिलांच्या बाजूने लागल्यास सदर सदनिका व गाळे रिकामे करून देणे भाग होईल व दाव्याचा निकाल संबंधितांवर बंधनकारक राहील याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

पनवेल
दि.०५/०१/२०२३

**सही/–**
**श्री.संजय ग. पाटकर**
**बि–१४, राधाहरी निवास**
**कॉम्प्लेक्स, लो.टिळक रोड, पनवेल**
**मो.नं.९९२००२७७३८**



**अपर जिल्हाधिकारी रायगड मुख्यालय अलिबाग यांचे न्यायालयात**
**जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अलिबाग, जि.रायगड**

क्रमांक/आरटीएस/अपिल क्र.२४४/२०२२

१) श्री.हसुराम जाना पाटील
२) श्री.अनंत जाना पाटील
३) श्रीम.भिमाबाई हरिभाऊ पाटील
४) श्रीम.जयवंती गणेश पाटील
५) श्रीम.वैशाली प्रल्हाद कोल्हेटकर
६) श्री.प्रशांत रामकृष्ण पाटील
७) श्रीम.उज्वला उर्फ कामिनी कांचन पाटील
८) श्री.अविनाश रामकृष्ण पाटील
९) श्रीम.आनंदी रामकृष्ण पाटील
१०) श्रीम.प्रतिभा पांडुरंग पाटील
११) श्री.प्रितम पांडुरंग पाटील
१२) श्रीम.प्रणाली प्रणय पाटील
१३) श्रीम.सुकन्या अशोक पाटील
सर्व रा.हरिश्चंद्र पिंपळे, ता.उरण, जि.रायगड — अपिलार्थी
विरुद्ध
१) श्रीम.राधाबाई भास्कर घरत
२) श्रीम.वनिता सत्यकांत घरत
३) कुमार अजय सत्यकांत घरत वतीने
अ.पा.क.म्हणून श्रीम.वनिता सत्यकांत घरत
४) कुमारी अमृता सत्यकांत घरत
५) श्रीम.प्रियंका प्रदीप घरत उर्फ प्रियंका देहू पाटील
६) कु.जान्हवी प्रदीप घरत वतीने
अ.पा.क.म्हणून आई श्रीम.प्रियंका प्रदीप घरत
७) माई राज जोशी उर्फ भास्कर घरत
सर्व रा.धाकटी जुई, ता.उरण, जि.रायगड
८) श्रीम.ताई उर्फ संगीता अनंत पाटील
रा.वाजे, ता.पनवेल, जि.रायगड
९) श्री.प्रशांत धाया जोशी
रा.विंधणे, पो.दिघोडे, ता.उरण, जि.रायगड
१०) श्री.हिरामण कमळाकर ठाकूर
रा.बोरखार, पो.दिघोडे, ता.उरण, जि.रायगड — उत्तरार्थी

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ नुसार अपील**

या जाहीर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, मौजे : हरिश्चंद्र पिंपळे, ता.उरण, जि.रायगड येथील सर्व्हे नं./हिस्सा नं.४८/२ क्षेत्र ०–३४–६० आकार ४.५६ या जमीन मिळकती संदर्भात अपिलार्थी यांनी या न्यायालयात दि.१०/०८/२०२२ रोजी अपिल दाखल केले आहे. सदर अपिलाची नोटीस काढली असता त्याची बजावणी होवू शकली नाही. आपला राहण्याचा शेवटचा पत्ता वरीलप्रमाणे असल्याची माहिती अपिलार्थी यांस आहे. सबब, अपिलार्थी या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, सदर अपिलामध्ये दि.११/०१/२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजता अपर जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचे न्यायालयात सुनावणी निश्चित करण्यात आलेली आहे. तरी आपण स्वतः अगर तुमचे वकीलांमार्फत सदर सुनावणीस हजर रहावे. आपण हजर न राहिल्यास आपले गैरहजेरीत अपिलाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : १९/१२/२०२२

**सही/–**
**अपर जिल्हाधिकारी रायगड**
**अलिबाग करिता**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## रोह्यात मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिर ; १८१ जणांची नेत्र तपासणी

**दै.रायगड नगरी । रोहा**

रोहा येथील नेत्ररुग्ण तपासणी शिबिरात बुधवारी १८१ रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ७३ रुग्णांना आजच आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रियेसाठी पाठवण्यात आले. गेल्या ७ महिन्यांत रोहा सिटिझन फोरम ट्रस्टच्या माध्यमातून तब्बल ४७८ नेत्ररुग्णांना नवी दृष्टी मिळाली आहे.

रोहा सिटिझन फोरम ट्रस्ट आणि आर. झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल, नवीन पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर घेण्यात आले.

रोह्याचे ग्रामदैवत श्री धावीर महाराजांच्या मंदीर सभागृहात झालेल्या या शिबिरात अल्पदरात चष्मे वाटप, मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर पार पडले.

हॉस्पिटलचे टीम मॅनेजर प्रकाश पाटील, डॉ सिमरन दिप कौर, प्रतिमा गावित, सोनाली पंदेरे, समृद्धी साळवी, दिपा परिहार, शुभम शिंदे, कल्पेश सावंत आदींनी रुग्णांची तपासणी केली.

रोहा सिटिझन फोरम ट्रस्ट चे अध्यक्ष नितीन परब, प्रदिप देशमुख, मिलिंद अष्टिवकर, दिलीप वडके, श्रीकांत ओक, अहमदशेठ दर्जी, उस्मानभाई रोहेकर, संतोष खटावकर, महेश सरदार, संदीप सरफळे, इल्यास डबीर, दिनेश जाधव, शैलेश रावकर, सचिन शेडगे, परशूराम चव्हाण, अमोल देशमुख, प्रशांत देशमुख, निलेश शिर्के, सिद्धेश ममाले, दिनेश मोहिते, समिधा अष्टिवकर, भावेश अग्रवाल, बिलाल मोर्बेकर आदी फोरम च्या सर्व सदस्यांनी शिबीर यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली. रोहा सिटीझन फोरम ट्रस्टचे अध्यक्ष नितिन परब यांनी सहयोगी संस्थांचे आणि शिबिरासाठी परिश्रम घेणाऱ्या सर्वांचे आभार मानले.

# विद्यार्थ्यांचा प्रवास सुखमय होण्यासाठी काँग्रेस पक्षाचा पुढाकार

## विविध समस्या बाबत दिले तहसीलदारांना निवेदन ; समस्या सोडविण्याची केली मागणी

**दै.रायगड नगरी । उरण**

काही वर्षांपूर्वी फुंडे स्टॉप जवळील एक पूल कमकुवत झाल्या कारणाने सर्व ड्ढ बस हे भेंडखळ द्रोणागिरी मार्गे वळविण्यात आले. त्यामुळे वीर वाजेकर महाविद्यालयसाठी (फुंडे विद्यालयासाठी) असलेले बस थांबे अनुपयोगी झाले आहेत. त्याचा वापर विद्यार्थ्यांकडुन होत नाही. आत्ता जिथे ड्ढ बस थांबवली जाते त्या नवीन ठिकाणी कोणताही अधिकृत थांबा नाही. आणि उभे राहायला साधे शेड सुद्धा नाही. सर्व विद्यार्थी ऊन पावसात बससाठी ताटकळत विना तक्रार उभे असतात. त्यांचा हा ज्वलंत प्रश्न घेऊन काँग्रेस पक्ष तालुका प्रमुख विनोदभाई म्हात्रे, तालुका सरचिटणीस वैभव ठाकूर आणि उरण शहर प्रमुख प्रकाश पाटील यांनी नायब तहसीलदार नरेश पेढवी यांना या समस्या बाबत निवेदन दिले.व ही समस्या सोडविण्याची मागणी केली.



या निवेदनाद्वारे काँग्रेस तर्फे बसफेऱ्या वाढविणे व मातीचा भराव करून शेड उभारणे असे दोन पर्याय सुचविण्यात आले आहेत. नायब तहसीलदार यांना सविस्तर माहिती देऊन लवकरात लवकर प्रश्न मार्गी लावण्याची विनंती विनोद म्हात्रे व वैभव ठाकूर, प्रकाश पाटील यांच्या तर्फे करण्यात आली आहे. तसेंच या विद्यार्थ्यांसाठी काँग्रेस पक्ष कुठल्याही प्रकारच्या मदतीसाठी प्रशासनाला सहकार्य करण्यास तयार आहे याची ग्वाही सुद्धा पक्ष तालुका अध्यक्ष विनोद म्हात्रे व तालुका सरचिटणीस वैभव ठाकूर यांच्या मार्फत देण्यात आली आहे.यावेळी रेखा घरत, बबन कांबळे, निर्मला पाटील, विनोद कदम, मंगेश म्हात्रे, नदाफ अकबर आदी काँग्रेसचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

विद्यालय भरण्याच्या आणि सुटण्याच्या वेळेनुसार काही ज्यादा एसटी बसेस उरण ते दास्तान फाटा व दास्तान फाटा ते उरण या मार्गावर सोडण्यात याव्यात. हे बस विद्यालयाच्या आवारात किंवा जुन्या बस थांब्यावर थांबविण्यात यावेत. आत्ता जिथे बस थांबविण्यात येत आहेत तिथे रस्त्याच्या बाजूला मातीचा भराव करून जागेची पातळी योग्य करून नवीन निवारा अथवा शेड उभारावे जेणेकरून विद्यार्थी तिथे व्यवस्थित बसून राहतील व रांगेत बसमध्ये चढउतार करतील जेणेकरून कोणताही अनुचित प्रकार होणार नाही अशा दोन प्रमुख मागण्या विनोद म्हात्रे,वैभव ठाकूर, प्रकाश पाटील यांनी तहसीलदारांकडे केली असता यावर सकारात्मक भूमिका घेणार असल्याचे नायब तहसीलदार नरेश पेढवी यांनी सांगितले.

# सेवापुस्तके पडताळणीकरिता विभागीय स्तरावर शिबिराचे आयोजन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

संचालक, संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांच्या परिपत्रकामधील निर्देशानुसार आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडे मोठया प्रमाणावर सेवापुस्तके पडताळणी करणे प्रलंबित असल्याचे कळविण्यात आले आहे. त्यामुळे तात्पुरते निवत्ती वेतन प्रदान करण्याची प्रकरणे मोठया प्रमाणावर आढळून येत आहेत.

शासन व संचालनालय स्तरावर ही प्रकरणे निकाली काढण्याकरिता व्यापक मोहीम हाती घेण्यात येणार आहे. विभागीय स्तरावर सेवा पुस्तके पडताळणी करण्याकरिता शिबिर आयोजित करण्यात येणार आहे. या शिबिरादरम्यान आपल्या अखत्यारीतील कार्यालयांमध्ये प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यात येवून जास्तीत जास्त सेवा-पुस्तके वेतन पडताळणीकरिता वेतन पडताळणी पथक, कोकण भवन येथे सादर करावीत. तसेच वेतन पडताळणी झालेली अशी प्रकरणे महालेखा-पाल कार्यालयास सादर करण्यात यावीत. माहे डिसेंबर २०२२ च्या वेतन देयकासोबत अशा सर्व तात्पुरती निवृत्तीवेतनधारकांची वेतन पडताळणी पूर्ण झाल्याबाबत कार्यालयप्रमुखाचे प्रमाणपत्र जोडण्यात यावे किंवा तात्पुरती निवत्ती वेतन अदा करण्याचे कारण नमूद करावे, असे जिल्हा कोषागार अधिकारी रमेश इंगळे यांनी कळविले आहे.


# नेरे येथे सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम











**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्वयंसिद्धा ग्रामीण महिला सामाजिक संस्था, नेरे व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नेरे यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नेरे येथे सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमांमध्ये मुलांची व पालकांची भाषणे झाली त्याचबरोबर पालक महिला वर्ग व विद्यार्थ्यांच्या संगीत खुर्चीचा कार्यक्रम घेण्यात आला सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या उपशिक्षिका सौ आरती अमोल डावरे यांनी केले. सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त पालकांनी आधुनिक सावित्री म्हणून शाळेच्या शिक्षकांना अभिवादन केले स्वयंसिद्धा ग्रामीण महिला सामाजिक संस्थेच्या सचिव ॲड. सुवर्णा शेटे भुजबळ यांनी मुलांना मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन सुषमा कमलाकर ठाकूर, मुख्याध्यापिका जिल्हा परिषद शाळा नेरे व सौ आरती अमोल डावरे आणि सौ विद्यार्थ्यांनी प्रवीण पवार उपशिक्षिका जिल्हा परिषद शाळा नेरे यांनी केले. ह्या कार्यक्रमासाठी शाळा व्यवस्थापन समिती च्या अध्यक्ष उपाध्यक्ष व माता पालक आणि पालक वर्ग उपस्थित होता. त्याचबरोबर स्वयंसिद्धा ग्रामीण महिला सामाजिक संस्थेच्या अध्यक्ष सौ हर्षदा मांडवकर व खजिनदार सौ विशाखा वासुदेव कांबळे उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सांगता संस्थेच्या वतीने मुलांना खाऊ वाटप करून व सौ आरती डावरे मॅडम यांच्या आभार प्रदर्शनाने झाली.

# शरण संकुल चॅरिटेबल सोसायटी नवी मुंबई तर्फे मकर संक्रांती उत्सव 2023 चे आयोजन

**दै.रायगड नगरी । उरण**

इष्टलिंग अविष्कार दिवस आणि मकर संक्रांती सणाचे औचित्य साधून वीरशैव लिंगायत समाजाच्या न्याय हक्कासाठी कार्यरत असणाऱ्या शरण संकुल चॅरिटेबल सोसायटी नवी मुंबई तर्फे रविवार दि १५ जानेवारी २०२३ रोजी शिव विष्णू मंदिर सभागृह, पहिला मजला, प्लॉट नं. ८/९, वाशी बस डेपोच्या पाठिमागे, सेक्टर ९/- वाशी, नवी मुंबई येथे सायंकाळी ५ वाजता इष्टलिंग दिवस आणि मकर संक्राती उत्सव २०२३ चे आयोजन करण्यात आले आहे.

हळदी कूंकू समारंभ व भेटवस्तू वाटप, लहान मुलांना फळांचा अभिषेक व भेट वस्तु वाटप, मराठी,कन्नड व हिंदी सदाबहार मधूर गीतांचा भव्य संगीतमय कार्यक्रम असे विविध सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. पाच वर्षे वयाच्या आतील मुलामुलींच्या पालकांनी संस्थेच्या सदस्यांकडे आपली नांवे नोंदवावीत. त्याचबरोबर कार्यक्रमानंतर सर्वांसाठी पारंपारिक महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून याचा आनंद घ्यावा असे आवाहन शरण संकुल चॅरिटेबल सोसायटीचे सर्व पदाधिकारी व सदस्यांनी केले आहे.शरण संकुल चॅरिटेबल सोसायटीचे सर्व पदाधिकारी सदस्य कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विशेष मेहनत घेत असून या कार्यक्रमात, उत्सवात सहभागी होण्यासाठी तथा अधिक माहितीसाठी सुनिता लक्कीमार - ९९२०५९३४१४, स्नेहा हळ्ळी - ९७०२०६६६६० यांच्याशी संपर्क साधावे असे आव-ाहन करण्यात आले आहे.


ॲड.रेणुका पाटील

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात
फौ.चौ.अर्ज क्र.१४४२/२०२२
ने.ता.२१/०१/२०२३

श्री.अभिमन्यू धर्मा नाईक — अर्जदार
विरुद्ध
पनवेल महानगरपालिका — सामनेवाला

कारणे जाहीर नोटीस देण्यात येते की,

ज्याअर्थी कै.रावजा पाड्या कातकरी यांचे निधन दि.२९/०९/१९८९ रोजी मौजे : कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी झाले होते. परंतु कै.रावजा पाड्या कातकरी यांच्या मृत्यूची नोंद पनवेल महानगरपालिका यांच्याकडील मृत्यू नोंदणी अभिलेखात झालेली नाही, त्याचे मृत्यूच्या नोंदणीसाठी अर्जदाराने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

तरी सदरच्या अर्जास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून या न्यायालयात स्वतः अगर आपले वकीलांमार्फत १ महिन्याचे आत आपली हरकत नोंदवावी. उक्त मुदतीत हरकत न आल्यास कोणासही याबाबत हरकत देण्याची नाही असे समजून हे न्यायालय वरील अर्जदार यांचा पुढील पुरावा घेवून नोंद घालण्याचा हुकूम करील याची नोंद घ्यावी.

आज दि.०४ माहे जानेवारी २०२२ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे सही-शिक्क्यानिशी दिली आहे.

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
फौ.न्याया, पनवेल



**अपर जिल्हाधिकारी रायगड मुख्यालय अलिबाग यांचे न्यायालयात जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अलिबाग, जि.रायगड**

क्रमांक/आरटीएस/अपिल क्र.२४३/२०२२

चिमाबाई रघुनाथ जोशी मयत तर्फे वारस
१) श्री.गजानन रघुनाथ जोशी
२) श्रीम.गुलाब प्रकाश धुमाळ
३) श्रीम.प्रभावती राजाराम म्हात्रे
४) श्रीम.निर्मला मच्छिंद्रनाथ घरत
५) श्रीम.सुमन सदानंद जोशी
६) श्री.सचिन सदानंद जोशी
७) श्रीम.स्मिता प्रशांत म्हात्रे
८) श्री.समाधान सदानंद जोशी
९) श्री.अभिजीत नरेश जोशी
१०) श्रीम.पुष्पलता नरेश जोशी
११) श्री.सिद्धार्थ नरेश जोशी
सर्व रा.हरिश्चंद्र पिंपळे, ता.उरण, जि.रायगड — अपिलार्थी
विरुद्ध
१) श्रीम.राधाबाई भास्कर घरत
२) श्रीम.वनिता सत्यकांत घरत
३) कुमार अजय सत्यकांत घरत वतीने
अ.पा.क.म्हणून श्रीम.वनिता सत्यकांत घरत
४) कुमारी अमृता सत्यकांत घरत
५) श्रीम.प्रियंका प्रदीप घरत उर्फ प्रियंका देहू पाटील
६) कु.जान्हवी प्रदीप घरत वतीने
अ.पा.क.म्हणून आई श्रीम.प्रियंका प्रदीप घरत
७) माई राज जोशी उर्फ भास्कर घरत
सर्व रा.धाकटी जुई, ता.उरण, जि.रायगड
८) श्रीम.ताई उर्फ संगीता अनंत पाटील
रा.वाजे, ता.पनवेल, जि.रायगड
९) श्री.प्रशांत धाया जोशी
रा.विंधणे, पो.दिघोडे, ता.उरण, जि.रायगड
१०) श्री.हिरामण कमळाकर ठाकूर
रा.बोरखार, पो.दिघोडे, ता.उरण, जि.रायगड — उत्तरार्थी

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ नुसार अपील**

या जाहीर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, मौजे : हरिश्चंद्र पिंपळे, ता.उरण, जि.रायगड येथील सर्व्हे नं./हिस्सा नं.४८/१ क्षेत्र ०-१९-५० आकार २.५६ या जमीन मिळकती संदर्भात अपिलार्थी यांनी या न्यायालयात दि.१०/०८/२०२२ रोजी अपिल दाखल केले आहे. सदर अपिलाची नोटीस काढली असता त्याची बजावणी होवू शकली नाही. आपला राहण्याचा शेवटचा पत्ता वरीलप्रमाणे असल्याची माहिती अपिलार्थी यांस आहे. सबब, अपिलार्थी या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, सदर अपिलामध्ये दि.११/०१/२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजता अपर जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचे न्यायालयात सुनावणी निश्चित करण्यात आलेली आहे. तरी आपण स्वतः अगर तुमचे वकीलांमार्फत सदर सुनावणीस हजर रहावे. आपण हजर न राहिल्यास आपले गैरहजेरीत अपिलाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : १९/१२/२०२२

सही/-
अपर जिल्हाधिकारी रायगड
अलिबाग करिता



मा.गुन्नाल साहेब कोर्ट

**अर्जदारांचे वकील**
**ॲड.एकनाथ जी. खुटले**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.१८९२/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.१७/०२/२०२३

१) श्रीमती.भारती मेघनाथ म्हात्रे, वय : ४० वर्षे
२) कु.दिव्या मेघनाथ म्हात्रे, वय : २१ वर्षे
३) कु.यश मेघनाथ म्हात्रे, वय : १५ वर्षे
क्र.३ ची अज्ञान पालन करणार आई
श्रीमती.भारती मेघनाथ म्हात्रे
सर्व रा.विठ्ठल मंदिराजवळ, जासई,
ता.उरण, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, कै.मेघनाथ अमृत म्हात्रे हे दि.२४/०७/२०२१ रोजी बॉम्बे हॉस्पिटल येथे मयत झाले आहेत. त्यांचे खालील वर्णनाचे मिळकतींबाबत वारसदाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी अर्ज केलेला आहे.

१ अ) मौजे : उलवे, ता.पनवेल, जि.रायगड येथील सेक्टर क्र.२० मधील प्लॉट नं.१७५ वर अस्तित्वात असलेल्या ''के.के.व्हीला'' या इमारतीमधील तिसऱ्या मजल्यावरील सदनिका क्र.३०२, क्षेत्र २८.४९६ चौ.मीटर कारपेट + टेरेस ३.११२ चौ.मीटर अशा वर्णनाची सदनिका.

१ ब) तसेच, मौजे : जासई, ता.उरण, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या जमिनीच्या मिळकतींमध्ये कै.मेघनाथ अमृत म्हात्रे यांचा अविभक्त हिस्सा आहे.

**जमिनींचे वर्णन**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १०० | ५ | ०-०७-१० पो.ख. ०-००-५० | १.१९ |
| १०० | ७ | ०-०७-०० | ०.१६ |
| १०० | १० | ०-०८-१० पो.ख. ०-०१-३० | ०.१६ |
| १०० | ११ | ०-०८-४० पो.ख. ०-०३-०० | १.२५ |

अर्जदार हे कै.मेघनाथ अमृत म्हात्रे यांचे, कायदेशीर वारसदार आहेत. त्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास, त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांच्या हरकती सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये हरकत सादर न केल्यास ना.कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.५/०१/२०२३ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



मा.मुजावर साहेब कोर्ट

**ॲड.उज्वला शिंदे-साळुंखे**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर सो पनवेल
दि.चौ.अर्ज नं.१५४७/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०२/०२/२०२३

१) श्रीमती.सुप्रिया किरण जाधव
वय : २९ वर्षे, धर्म : हिंदू
२) कु.आयुष किरण जाधव
वय : ९ वर्षे, धर्म : हिंदू
३) कु.पारस किरण जाधव
वय : ५ वर्षे, धर्म : हिंदू
४) श्रीमती.सिंधूताई परशुराम जाधव
वय : ५८ वर्षे, धर्म : हिंदू
अर्जदार क्र.२ व ३ तर्फे अ.पा.क.आई अर्जदार क्रं.१
सर्व रा.सदनिका नं.बी-२०४, दुसरा मजला,
कैलाश भवन, प्लॉट नं.३९, सेक्टर ४,
बेलपाडा-खारघर, नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

कै.किरण परशुराम जाधव यांच्या नावे असलेल्या सदनिकेचे वर्णन खालीलप्रमाणे

**१) सदनिका नं.बी-२०४, दुसरा मजला, कैलाश भवन, प्लॉट नं.३९, सेक्टर-४, बेलपाडा-खारघर, नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड, क्षेत्र ३४.१० स्क्वे.मीटर**

**२) सदनिक नं.ए-२०४, दुसरा मजला, पंचानंद हाईटस्, प्लॉट नं.१५, १७, १८ सेक्टर-९, फेज-१, तळोजा पाचनंद, नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड, ६०.१९० स्क्वे.मीटर + ८.९१० स्क्वे. मीटर टेरेस**

वरील अर्जदार क्र.१ श्रीमती.सुप्रिया किरण जाधव, कै.किरण परशुराम जाधव यांची पत्नी आहे. अर्जदार क्र.२ आयुष किरण जाधव हा त्यांचा मुलगा आहे. अर्जदार क्र.३ कु.पारस किरण जाधव हा त्यांचा मुलगा आहे. अर्जदार क्र.४ श्रीमती.सिंधूताई परशुराम जाधव ही त्यांची आई आहे.

कै.किरण परशुराम जाधव यांचे निधन दि.१४/११/२०२० रोजी सह्याद्री हॉस्पिटल पुणे येथे झाले आहे. कै.किरण परशुराम जाधव यांच्या निधनाची नोंद पुणे महानगरपालिका शिवाजी नगर-घोले रोड वॉर्ड येथे रेकॉर्ड सदरी केलेली आहे व पुणे महानगरपालिका शिवाजी नगर-घोले रोड वॉर्ड यांनी त्याप्रमाणे मृत्यूचा दाखला दिलेला आहे. सदर दाखला अर्जासोबत जोडलेला आहे.

वरील उक्त अर्जदारांनी वारस दाखला मिळविण्याकरिता अर्ज दाखल केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल आणि वारस दाखल्याबद्दल कोणाचे हक्क अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०५/०१/२०२३ रोजी सहीने व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



मा.मुजावर साहेब कोर्ट

**ॲड.उज्वला शिंदे-साळुंखे**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर सो पनवेल
दि.चौ.अर्ज नं.१५४६/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०२/०२/२०२३

१) श्रीमती.सिंधूताई परशुराम जाधव
वय : ५८ वर्षे, धर्म : हिंदू
२) श्री.अमोल परशुराम जाधव
वय : ३५ वर्षे, धर्म : हिंदू
३) श्री.अमर परशुराम जाधव
वय : ३२ वर्षे, धर्म : हिंदू
४) कै.किरण परशुराम जाधव मयत वारस
४ अ) श्रीमती.सुप्रिया किरण जाधव
वय : २९ वर्षे, धर्म : हिंदू
४ ब) कु.आयुष किरण जाधव
वय : ९ वर्षे, धर्म : हिंदू
४ क) कु.पारस किरण जाधव
वय : ५ वर्षे, धर्म : हिंदू
अर्जदार क्र.४ ब व ४ क तर्फे अ.पा.क.आई अर्जदार क्रं.४ अ
सर्व रा.सदनिका नं.बी-२०४, दुसरा मजला,
कैलाश भवन, प्लॉट नं.३९, सेक्टर ४,
बेलपाडा-खारघर, नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

कै.परशुराम बंडू जाधव यांच्या नावे असलेल्या सदनिकेचे वर्णन खालीलप्रमाणे

**१) सदनिका नं.बी-२०४, दुसरा मजला, कैलाश भवन, प्लॉट नं.३९, सेक्टर-४, बेलपाडा-खारघर, नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड, क्षेत्र ३४.१० स्क्वे.मीटर**

वरील अर्जदार क्र.१ श्रीमती.सिंधुताई परशुराम जाधव, कै.परशुराम बंडू जाधव यांची पत्नी आहे. अर्जदार क्र.२ श्री.अमोल परशुराम जाधव हा त्यांचा मुलगा आहे. अर्जदार क्र.३ श्री.अमर परशुराम जाधव हा त्यांचा मुलगा आहे. अर्जदार क्र.४ अ) श्रीमती.सुप्रिया किरण जाधव ही त्यांची सुन आहे. ४ ब) कु.आयुष किरण जाधव हा त्यांचा नातू आहे. ४ क) कु.पारस किरण जाधव हा त्यांचा नातू आहे.

कै.परशुराम बंडू जाधव यांचे निधन दि.२४/१०/२०१६ रोजी जी.टी.बी. हॉस्पिटल मुबई येथे झाले आहे. कै.परशुराम बंडू जाधव यांच्या निधनाची नोंद बृहन्मुंबई महानगरपालिका साऊथ वॉर्ड येथे रेकॉर्ड सदरी केलेली आहे व बृहन्मुंबई महानगरपालिका साऊथ वॉर्ड यांनी त्याप्रमाणे मृत्यूचा दाखला दिलेला आहे. सदर दाखला अर्जासोबत जोडलेला आहे.

वरील उक्त अर्जदारांनी वारस दाखला मिळविण्याकरिता अर्ज दाखल केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल आणि वारस दाखल्याबद्दल कोणाचे हक्क अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०५/०१/२०२३ रोजी सहीने व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## पनवेल रेल्वे पोलिसांनी दोन प्रवाश्यांचे चोरलेले मोबाईल केले परत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात चोरीस गेलेले दोन मोबाईल फोन पुन्हा प्रवाश्यांना पनवेल रेल्वे पोलिसांनी परत केले आहेत. पनवेलमधील रेल्वे पोलिस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात प्रवासी अंकुश चक्रनारायण यांचा ४५ हजार रुपये किमतीचा आणि संतोष कुंभार यांचा २२ हजार रुपये किमतीचा मोबाइल चोरीला गेला होता. या घटने बाबत त्यांनी रेल्वे पोलिसांमध्ये तक्रार दाखल केली होती. त्यानुसार पोलिसांनी कारवाई करत दोन्ही प्रवाशांचे मोबाइल शोधून त्यांना परत केले आहेत. याबद्दल प्रवाशांनी पोलिसांचे आभार मानले आहेत.

## इग्नू बीएड, बीएससी (नर्सिंग) आणि पीएच.डी.साठीची परीक्षा वेळापत्रक जाहीर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

इग्नू बीएड, बीएससी (नर्सिंग) आणि पीएच.डी.साठी प्रवेश परीक्षा येत्या रविवारी ८ जानेवारी २०२३ आयोजित करण्यात आली आहे. यामध्ये बीएड साठी सकाळी १० ते दुपारी १२(२ तास), इ.ड्ल (नर्सिंग) साठी दुपारी २ ते ४.३०(२ तास) व झह.ऊ साठी दुपारी २ ते ५ (३ तास) अशी असणार आहे यासाठी उमेदवाराने इग्नू द्वारे जारी केलेले हॉल तिकीट आणि वैध ओळख पुरावा सोबत आणावा. हि परीक्षा डॉ. के. एम. वासुदेवन पिल्लई कॅम्पस, प्लॉट क्र. १०, सेक्टर १६, नवीन पनवेल ४१०२०६. येथे होणार असल्याची माहिती इग्नू मुंबईचे प्रादेशिक संचालक (आय/सी) डॉ. कृष्ण राव ई. यांनी दिली आहे.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# महाविकास आघाडीचे ७ तर भाजपचे ३ उपसरपंच

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील उपसरपंच निवडीमध्ये महाविकास आघाडीने बाजी मारलेली दिसत आहे. महाविकास आघाडीचे ७ तर भाजपचे ३ उपसरपंच विराजमान झालेले आहेत.

शिरढोण येथे प्रीती प्रशांत गायकवाड (शिवसेना), केळवणे येथे किशोर मधुकर ठाकूर (शेकाप), भातान येथे बाळाराम सिताराम मुकादम ( शिवसेना), दिघाटी येथे सुनील बामा गावंड (शेकाप), नितळस येथे रतन राम भोईर (शेकाप), चिंध्रण येथे सुनील नामदेव पाटील (राष्ट्रवादी काँग्रेस), कानपोली येथे रामचंद्र बाळाराम पाटील (काँग्रेस) हे महाविकास आघाडीचे उपसरपंचपदी विराजमान झाले.

उपसरपंच निवडीत एकूण १० पैकी ७ जागेवर महाविकास आघाडीचे प्राबल्य असल्याचे दिसून आले. तर शिवकर ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी संतोष मते (भाजप), नेरे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचदी निलिमा निलेश पाटील (भाजप), तर करंजाडे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी सागर आंग्रे (भाजप) यांची निवड झाली आहे.


या वेळी भाजपा आणि महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.






# पासपोर्ट व्हेरिफेक्शन मधील अडथळे दूर; पोलीस आयुक्तांनीच घालुन दिली नवी नियमावली

**दै.रायगड नगरी । पनवेल**



पासपोर्टसाठी अर्ज केल्यावर पोलीस ठाण्यात मारावे लागणारे खेटे,पोलीस प्रशासनाचेच वेळकाढू धोरण यावर नवनियुक्त पोलीस आयुक्त मिलिंद भांबरे यांनीच नवे परिपत्रक काढुन नागरिकांना दिलासा दिला आहे. वेळेत हि प्रक्रिया पूर्ण न करणाऱ्या पोलीस प्रशासनातील अधिकाऱ्यांनाच कारवाईला सामोरे जावे लागणार आहे.

कालमर्यादा पेक्षा अधिक दिवस प्रकरण प्रलंबित ठेवल्यास संबंधित जबाबदार अधिकाऱ्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल असे आदेश पोलीस आयुक्तांच्या सूचनेनुसार नवी मुंबई विशेष शाखेचे उपायुक्तकडून कडून पारित करण्यात आले आहेत. नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात वास्तव्य करणारे नागरिक पासपोर्ट साठी ऑनलाईन अर्ज सादर केल्यावर काही पोलीस ठाण्यातून तात्काळ अहवाल बेलापूर येथील पोलीस आयुक्त कार्यालयात पाठविले जात असे तर काही पोलीस ठाण्यात व्हेरिफिकेशन प्रलंबित ठेवले जात असे. दरम्यान पोलीस ठाण्यातून आवाहल प्राप्त झाल्यावर बेलापूर येथील कार्यालयात दहा दिवसाहुन अडवून ठेवत पासपोर्ट कार्यलयात अहवाल पाठविण्यासाठी चालढकल करून नागरिकांकडून चिरीमिरीची मागणी केली जात असे. पोलीस आयुक्त मिलिंद भांबरे यांनी पासपोर्ट संदर्भात आढावा घेतला असता, मोठया प्रमाणात पासपोर्ट व्हेरिफिकेशन प्रलंबित असल्याचे तसेच नागरिकांना त्रास देत असल्याचे निदर्शनास येताच त्यांनी तात्काळ आदेश दिल्यामुळे नवी मुंबई विशेष शाखेचे उपायुक्त प्रशांत मोहिते यांनी नवी मुंबईतील पोलीस ठाण्यात सात दिवस आणि नागरी सुविधा केंद्रात पाच दिवसात व्हेरिफिकेशन करून तात्काळ पासपोर्ट कार्यालयात पाठविण्यात यावे काही कारणास्तव प्रलंबित ठेवल्यास संबंधित जबाबदार अधिकाऱ्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल असे आदेश दिल्यामुळे नागरिक समाधान व्यक्त करत आहे. सिक्युरिटी गार्ड पीसीसी,अब्रॉड पीसीसी शासकीय विभाग व नोकरी संदर्भात चरित्र पडताळणी वाहनांसंबंधी पडताळणी आदीचे पत्राचे पोलीस ठाण्यातून चौदा दिवस ते नागरी सुविधा केंद्रातून पाच दिवस तसेच नोरी व्हिसा,लाँग टर्म व्हिसा,व्हिसा एक्सटेंशन पडताळणी, एक्झिट परमिशन पडताळणी, नागरिकत्वा संदर्भात पडताळणी,ओसीआय पडताळणी आदी चौदा दिवसात आणि कर्तारपूर भेट पडताळणी पाच ते दोन दिवसात देण्यात यावे असे आदेश सर्व पोलीस ठाणे आणि नागरी सुविधा केंद्रात देण्यात आले आहे. पासपोर्ट व्हेरीफिकेशनच्या नावाखाली सर्वसामान्य नागरिकांकडून पैसे उकळण्याचे काम देखील काही कर्मचारी करत असल्याच्या तक्रारी पुढे आल्या होत्या.नव्या आदेशाने या सर्वाला आवर बसेल अशी आशा व्यक्त करण्यात येत आहे.

# श्रीवर्धन परिवहन आगारातील भंगार व नादुरुस्त गाड्यांमुळे प्रवासी त्रस्त

## परिवहन मंत्र्यांनी तातडीने लक्ष न दिल्यास आंदोलन?

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

दहा ते बारा वर्षांपूर्वी श्रीवर्धन परिवहन आगार विभागामध्ये तसेच राज्यामध्ये एक नंबरचे उत्पन्न देणारे आगार होते. श्रीवर्धन परिवहन आगाराच्या लांब पल्ल्याच्या अनेक फेऱ्या त्यावेळी चांगले उत्पन्न आणून आगाराला भरघोस उत्पन्न देत होत्या. त्यावेळेला नवीन गाड्या देखील श्रीवर्धन आगारामध्ये नियमितपणे दिल्या जात असत. तसेच त्यावेळी असलेले आगार प्रमुख हे देखील अनुभवी व कामामध्ये रुची असणारे होते. त्याचप्रमाणे त्यांच्या हाताखाली असणारा कामगार वर्ग देखील गाड्यांचे काम योग्य प्रमाणात करत होता. त्यामुळे श्रीवर्धन परिवहन आगाराचा कारभार योग्य दिशेने सुरू होता. परंतु श्रीवर्धन आगार तोट्यामध्ये जाण्याचे मुख्य कारण माणगाव आगाराची निर्मिती झाल्यानंतर श्रीवर्धन आगाराचे उत्पन्नाचे स्त्रोत खूप मोठ्या प्रमाणावर कमी झाले.



एकेकाळी श्रीवर्धन आगारातून कोल्हापूर, त्याचप्रमाणे बीड, लातूर अशा लांब पल्ल्याच्या मार्गावरती फेऱ्या सुरू होत्या. परंतु आज मितिला आगारात बसेसची उपलब्धता नसल्यामुळे या फेऱ्या बंद पडल्या असून, केवळ श्रीवर्धन सातारा व श्रीवर्धन मिरज या बस फेऱ्या सुरू आहेत. तर श्रीवर्धन पुणे या दिवसातून दोन बस फेऱ्या सुरू आहेत. श्रीवर्धन आगारात सध्या शिवशाही व स्लीपर कोच असलेल्या गाड्या त्याचप्रमाणे नवीन आलेल्या विठाई गाड्या सोडल्या तर जुन्या असलेल्या गाड्या लांब पल्ल्याला पाठवण्याच्या परिस्थितीत नसल्याचे दिसून येते.सध्या मुंबई, बोरिवली, ठाणे, भाईंदर, नालासोपारा, कल्याण, भिवंडी या फेऱ्या सुध्दा वेळापत्रका नुसार सुटत नाहीत. अनेक वेळा स्थानिक फेऱ्यांवरती सुद्धा गेलेल्या गाड्या ब्रेक फेल होणे, ब्रेक डाऊन होणे, टायर पंचर होणे या कारणाने नेहमीच बंद पडलेल्या पाहायला मिळतात. गेल्या अनेक वर्षांपासून श्रीवर्धन आगारामध्ये नवीन बस गाडी देण्यातच आलेली नाही. तसेच गाड्यांना लागणारे सुटे भाग देखील पुरवण्यात महामंडळाकडून दिरंगाई केली जात आहे. श्रीवर्धन आगारात आगार प्रमुख असलेले तेजस गायकवाड यांची बदली रोहा आगारात झाल्याने, त्यांच्या जागी श्रीवर्धन येथे एका वाहतूक निरीक्षकाच्या हातात श्रीवर्धन परिवहन आगाराचा आगार प्रमुख पदाचा कार्यभार देण्यात आलेला आहे.

गाड्यांची नादुरुस्त असलेली अवस्था, त्याचप्रमाणे उपलब्ध असलेल्या गाड्यांवरती अनेक फेऱ्यांचा ताण, यामुळे गाड्या वेळेवर न सुटणे. त्याचप्रमाणे गाड्या सुटल्यानंतर रस्त्यामध्ये बंद पडणे. याच्या प्रमाणामुळे श्रीवर्धन आगाराचे नाव प्रचंड बदनाम होत आहे. पंधरा दिवसांपूर्वी श्रीवर्धन पुणे व श्रीवर्धन मिरज या बसेसची मागची चाके निखळल्याचा प्रकार देखील झाला होता. श्रीवर्धन आगारातील खराब बसेसचा ठपका ठेवून अनेक कर्मचाऱ्यांना विनाकारण निलंबित देखील करण्याचे प्रकार झालेले आहेत. तरी राज्याच्या परिवहन मंत्र्यांनी श्रीवर्धन आगाराबाबत तातडीने गांभीर्यपूर्वक लक्ष देऊन श्रीवर्धन आगारामध्ये अनुभवी आगार प्रमुख नेमावा. त्याचप्रमाणे श्रीवर्धन आगारासाठी नवीन बसेस उपलब्ध करून द्याव्या. अशी मागणी प्रवासी वर्गावकडुन होत आहे. अन्यथा प्रवाशांना आंदोलन केल्याशिवाय पर्याय उरणार नाही. असे प्रवासी वर्गाकडून बोलले जात आहे.

# माथेरानमध्ये सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी

**दै.रायगड नगरी । माथेरान**

प्राचार्य शांताराम यशवंत गव्हाणकर विद्यामंदिर माथेरान या शाळेत ३ जानेवारी रोजी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

प्रत्येक वर्गाच्या विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित छोट्या छोट्या नाटूकल्या तयार करून सादर केल्या. काही विद्यार्थिनी सावित्रीबाईंच्या पोशाखात आलेल्या होत्या. सावित्रीबाईंच्या जीवनातील महत्वाच्या घटना नाट्य रुपात दाखविल्यामुळे मुलांच्या ज्ञानात भर पडली.

या प्रसंगी शिक्षक संघपाल वाठोरे यांनी सावित्रीबाई यांच्या जीवनातील विविध पैलू विद्यार्थ्यांना उलगडून सांगितले. सावित्रीबाई तत्कालीन समाजात सुद्धा पुरोगामी होत्या याची उदाहरणे दिली. शिक्षिका विदुला गोसावी यांनी सावित्रीबाईंच्या लुगड्याची गोष्ट मुलांना सांगितली तर शिक्षक रमेश ढोले यांनी आपण महापुरुषांच्या विचारांचा आदर्श घेणे गरजेचे आहे असे नमूद केले.



# रेझिंग डे निमित्त सुषमा पाटील विद्यालयातील विद्यार्थ्यांना शारीरिक व मानसिक बदला विषय करण्यात आले समुपदेशन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र पोलीस स्थापना दिनाच्या निमित्ताने पोलीस आयुक्तालय नवी मुंबई अंतर्गत कामोठे पोलीस ठाणे व दिशा महिला मंच आयोजित रेझींग डे निमित्ताने कळी उमलताना व तारुण्याच्या उंबरठयावर उपक्रमाअंतर्गत परिसरातील शाळामध्ये तज्ञ व्यक्तिकडून मार्गदर्शन करण्यात आले.

त्याअंतर्गत सुषमा पाटील विद्यालय, कामोठे येथील मुला - मुलींना त्यांच्यातील शारीरिक व मानसिक बदलाविषयीचे समुपदेशन विनस वूमन्स हॉस्पिटलच्या डॉ. श्वेता जायभाये यांनी केले तसेच शालेय जीवनातील आपल्याला तसेच आजूबाजूला होणाऱ्या अन्यायाचा प्रतिकार कसा करावा तसेच पोलीस मित्र म्हणून कशा प्रकारे त्यांची मदत घेऊ शकतो यावर वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक किरण राऊत यांनी मार्गदर्शन केले. त्यांचबरोबर दिशा फ्रेंड म्हणून दिशा व्यासपीठ कसे मुला - मुलिंसाठी नेहमी पाठीशी असेल यावर विद्या मोहिते यांनी आश्वासन दिले. किशोरवयीन कालखंडाला वादळी काळ असे म्हटले जाते या काळात आयुष्याची नौका भरकटायला नको, या विचाराने या लेक्चरची आवश्यकता होती. योग्य व्यक्तींकडून मुलामुलींना मार्गदर्शन मिळत आहे, याबाबत शाळेतून आनंद व्यक्त केला. यावेळी कामोठे पोलीस ठाण्याच्या गोपनीय विभागाचे जाधव, दिशा महिला मंचच्या निलम आंधळे तसेच सुषमा पाटील स्कूल चे मंदार पनवेलकर, काटकर सर, व इतर २० शिक्षक आणि २०० विद्यार्थी उपस्थित होते.










# येरळ शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन

**दै.रायगड नगरी । रोहा**

रोहा तालुक्यातील आदर्श शाळा येरळ येथे सन २०२२-२३ चे वार्षिक स्नेहसंमेन अतिशय आंददायी वातावरणात संपन्न करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या विविध सूप्त कलागुणांना, बौद्धिकते बरोबर अन्य गुणांना वाव मिळावा या हेतूने याकार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी मुख्याध्यापक जगन्नाथ आब्दागिरे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. येरळ ग्रा.पंचायतचे सरपंच विमल दळवी ,उपसरपंच संध्याताई मोरे, सदस्या प्रिया मोरे, गाव कमिटी अध्यक्ष दयाराम महाडिक, प्रमुख पाहुणे चिंतामण दळवी, शाळा व्यस्थापन अध्यक्ष जान्हवी मोरे, उपाध्यक्ष सुवर्णा जाधव, शिक्षण तज्ज्ञ हरिश्चंद्र कुर्ले, माजी सरपंच विष्णू मोरे, माजी अध्यक्ष विजय साळुंखे, शाळा व्यस्थापन समितीचे माजी अध्यक्ष रामदास शिंदे, सुरेश मोरे, प्रविन मोरे, बाळकृष्ण आयरे आदी प्रमुख मान्यवर उपस्थित होते. शाळेतील परिसर तसेच मुलांच्या प्रगतीचा आलेख पाहून सरपंच विमल दळवी यांनी शिक्षकांचे कौतुक केले.७५ वा सुवर्ण महोत्सवी निमित्त केंद्रस्तरीय विविध स्पर्धेत शाळेच्या तीन मुलांनी प्रथम क्रमांक मिळवल्या बदल त्यांना मान्यवरांच्या हस्ते मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. अशीच प्रगती कायम राहण्यासाठी ग्रामपंचायत नेहमी आपल्या पाठीशी राहिल असे आश्र्वासन त्यांनी दिले.गावाच्या व मुंबई मंडळाच्या माध्यमातून शाळेला थकीत वीजबिल तब्बल बावीस हजार पाचशे रूपये भरून शाळा प्रकाशमय केल्याचे आभार मुख्याध्यापक आब्दागिरे यांनी मानले.असेच या वर्षात शाळेला मदत करण्याचे आवाहन केले.याचीच रीघ धरून माजी सरपंच विष्णू मोरे यांनी शाळेला नेहमी मदत राहील असे शब्द दिले. तदनंतर प्रत्यक्ष कार्यक्रमाला सुरुवात झाली.नृत्य गायन नाटिका अशा विविध कार्यक्रमाने ग्रामस्थांचे मन जिंकुन घेतले, शेवटी उपस्थित मान्यवरांचे आभार शाळेच्या उपशिक्षिका श्रीमती विद्या बुधवंत यांनी मानले व वंदेमातरम गीताने सांस्कृतिक कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.